# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०३/०६/२०१९

### सभा सुचना क्रं. ०१

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०२/२०१९ ची तहकुब सभा दि. ११/०२/२०१९ तसेच २८/०२/२०१९ व दि. ०५/०३/२०१९ रोजीचे केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि ०३/०६/२०१९ कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव दिलेले होते ते सभेने अवलोकन केले. त्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. सूचक :- मा.श्री.<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण महिला व मुलींना तांत्रिक प्रशिक्षण देण्याबाबत कमी दराच्या निविदाधारकांच्या दरास मंजूरी देऊन कमी दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करण्यास मान्यता देण्याबाबत. | ठराव :- सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महिला व मुलींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यांत यावे व गोषवऱ्यात नमुद केल्याप्रमाणे एम.एस.सी.आय.टी, टॅली व डि.टी.पी. या करीता मे. ऋषि कम्पुटर, मे. युनिर्व्हसल आय.टी. कम्पुटर एजुकेशन व मॅगीटेक वर्ल्ड एज्युकेशन यांना प्रती लाभार्थी ४,३००/- रु. याप्रमाणे प्रभागनिहाय कामे विभागून देण्यांत यावी व इंग्लीश स्पिकिंगकरीता मे. युनिर्व्हसल आय.टी. कम्पुटर एज्युकेशन व मॅगीटेक वर्ल्ड एज्युकेशन यांना प्रती लाभार्थी ४,३००/- रु. याप्रमाणे प्रभागनिहाय कामे विभागून देण्यांत यावी व डिजीटल मार्केटिंग या करीता मे. युनिर्व्हसल आय.टी. कम्पुटर एज्युकेशन यांना प्रती लाभार्थी ९४०/- याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करण्यास व अंदाजे ४१,००,०००/- अक्षरी रु. (एक्केचाळीस लक्ष रुपये मात्र ) येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत जि.प. शाळेतील | ठराव :- सदरच्या जि.प.शाळेच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. १) मे.हरजित कलेक्शन घटक क्र.१ (अ,ब,क) दप्तर ९००X९०० कोड मॅटी मटेरिअल प्रती नग दर अनुक्रमे १७२/- रुपये १९२/- रुपये २१३/- रुपये, घटक क्र.२ रेनकोट (अ.ब.क) प्रति नग दर अनुक्रमे रु. १५५/- ,रु १६९/-,रु १८२/- घटक क्र.४ (अ) प्रती नग दर अनुक्रमे रु.३२.५०/- २)मे.यश एंटरप्रायझेस |

| | | |
|---|---|---|
| | विद्यार्थ्यांसाठी सन २०१९ -२० या वित्तीय वर्षात शालेय साहित्य वाटप करणेकामी कमी दराच्या निविदाधारकाच्या दरास मंजूरी देऊन कमी व योग्य दराच्या निविदाधारकासोबत संविदा करण्यास मान्यता देण्याबाबत. | घटक क्र.३ (अ.ब.क.ड.इ) सँडल पीयु सोल (प्लेन ब्लॅक) पॅरागॉन प्रती नग दर अनुक्रमे रु.१४७/-,रु.१५४/-,रु.१६८/-,रु.१७२/-,१८५/- घटक क्र.९ (अ) प्लास्टीक स्केल (कॅमलीन) प्रती नग दर अनुक्रमे रु.७.१५/- ३) मे.एच.एम.पी एंटरप्रायझेस घटक क्र.३ (ई,उ) सँडल पीयु सोल(प्लेन ब्लॅक ) पॅरागॉन प्रती नग दर अनुक्रमे रु.२१२/-, रु २१२/- घटक क्र ५ (अ) स्टुडंन्टस पोस्टर कलर्स (फेबर कास्टल) प्रती नग दर अनुक्रमे रु.६४.९०/- घटक क्र ७(अ) ड्राईंग बुक (कॅमलीन) प्रती नग दर अनुक्रमे रु २२.७५/- घटक क्र.८(अ) पेन्सील (फेबर कास्टल) प्रती नग दर अनुक्रमे रु ३२.५७/- ४) मे. जेएमडी एंटरप्रायझेस घटक क्र.६ (अ) कंपास बॉक्स(क्लासमेट) प्रती नग दर अनुक्रमे रु ६०.९०/-,घटक क्र.१० बही (कॉसमॉस) ८० पृष्ठ व १७६ पृष्ठ प्रती नग दर अनुक्रमे रु.१२.३०/- व रु.१८.१०/- सदर दराच्या बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता, सदर बाजारभाव योग्य व वाजवी असल्याने, दर मंजुर करण्यात येत आहे. मे.यश एंटरप्रायझेस यांचे दप्तर व रेनकोट या दोन घटकांसाठीचे नमुने जुळत नसल्यामूळे या दोन घटकांसाठी यांची निविदा दि.२६/०२/२०१९च्या निविदर दर कमिटीच्या बैठकीत अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यांचे उर्वरित घटक प्लास्टीक स्केल व इ. १ ली ते ५ वी चे सँडल हे साहित्य मे.यश एंटरप्रायझेस यांनी पुरवठा करावे. दप्तर व रेनकोट यासाठी या नंतरचे कमी दर असलेले निविदाधारक मे.हरजित कलेक्शन यांनी दप्तर व रेनकोट हे साहित्य पुरवठा करावे, असे दि.२६/०२/२०१९ रोजीच्या निविदा कमिटीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मा.गटशिक्षण अधिकारी,पंचायत समिती,वसई दि.२३/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० ची अंतिम पटसंख्या दि.१ जुलै २०१९ रोजी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे पत्रात नमुद करण्यात आले आहे. तरी पंचायत समिती,वसई यांचेकडुन प्राप्त झालेल्या यादीनुसार साहीत्य मागविण्यात यावे व दि. १ जुलै २०१९ रोजी उपलब्ध होणाऱ्या पटसंख्येनुसार पटसंख्या वाढल्यास वाढीव साहीत्य मागविण्यात व वाढीव पटसंख्येनुसार कार्यादेश देण्यात यावे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३(क) अन्वये सर्वात कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविधा करण्यास, व जि.प.शाळेतील मुलांना आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करण्यास येणाऱ्या अंदाजे २३,००० विद्यार्थ्यांकरिता रुपये २,००,००,०००/- अक्षरी (दोन कोटी रुपये मात्र) खर्चास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ५७ मधील समेळ (सम्राट अशोका नगर) येथे गेट बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सभेत प्रस्तावाचे वाचन करण्यांत आले. सभागृहात प्रस्तावर चर्चा करणेंत आली. या प्रस्तावाचे अनुषंगाने कोर्टाचे आदेश, निर्बंध आहेत. त्यामुळे शासनाची पुर्व परवानगी घेवून तद्नंतर विषय सभेपुढे सभेपुढे ठेवणेंत यावा. तुर्तास हा प्रस्ताव स्थगित ठेवणेंत यावा असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक मा.श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ५. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पु) जिवदानी पायथा येथील क्रिकेट मैदान (ग्रांऊड) चे वार्षिक ठेका पध्दतीने देखभाल करणे (बी-२ निविदा) कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती ठराव क्र. ४९३ दि. २५/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. रेन्बो कन्स्ट्रक्शन ह्यांची कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | **सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H व I मधील पाईप गटाराचे बांधकाम करणे कामी विविध व्यासाचे RCC पाईप पुरवठा करणे.** | ठराव :- सदर कामास मा.सवसाधारण सभा ठराव/विषय क्र. ०९ दिनांक १९/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय वित्तीय मान्यता दिली आह. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या पाहताल मे. पाटील कन्स्ट्रक्शन ह्यांचे निविदा दर सन २०१९-२० करीता सर्वात कमी व वाजवी आहेत. तसेच सार्व.बांधकाम विभागाकडून नविन (SSR/दरसूचि) निर्गमित झाल्यानंतर मे.पाटील कन्स्ट्रक्शन यांनी सन २०२०/२१ व सन २०२१/२२ करीता भरलेल्या दरांची नविन SSR/दरसूचि नुसार तुलना करून पुढील २ वर्षाकरीताचे दर वाटाघाटीने निश्चित करून पाईप पुरवठा करण्याचे आदेश देणे उचीत व योग्य ठरेल. तसेच नविन SSR/दरसूचि प्रसिध्द होईपर्यंत चालु बर्षाच्या दरसुची नुसार दर लागू राहतील. तरी मे.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे सन २०१९/२० करीताचे प्राप्त दर (वाटाघाटीअंती) योग्य व कमी आहेत. तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक मे. बाबा कन्स्ट्रक्शन व मे अरुणोदय कन्स्ट्रक्शन कंपणी यांना मे.पाटील कनस्ट्रक्शन यांच्या निम्नत्तम दराने काम करणेस तयार असल्याचे आपल्या दि. २५/०१/२०१९ रोजीच्या लेखी पत्राद्वारे कळविले असल्याने त्यांची सदर पॅनलवर नियुक्त करण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) /(ड) याकामी कमी दराच्या निविदाधारकास मा.निविदा समिती व मा.आयुक्त ह्यांनी मान्यता दिली असून संविधा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क)/(ड) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा. श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | **विरार (प) प्रभाग क्र.०९ मध्ये नंदाखाल येथील जेम्स लोबो यांच्या घरापासून बेन्सन डिमेलो यांच्या घरापर्यंत गटार बनविणे या कामी प्राप्त निविदांपैकी** | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.सुहास एंटरप्रायजेस ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा (-) ०.५०% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे |

| | | |
|---|---|---|
| | लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकी-य व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा. श्रीम.सुषमा लोपीस<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ८. | प्रभाग समिती - एफ क्षेत्रातील वार्ड क्र. ४२ श्रीधर नगर ते भागवत टेकडी येथे रस्ता खडीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. माही कन्स्ट्रक्शन यांची निविदा १८.२०% कमी दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधनियम १९४९ चे कलम (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा. श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ९. | प्रभाग समिती ई नवीन आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. जुना ८३ नवीन १११ मधील मुळगाव येथील पी.जे. डिमेलो मार्ग साईडपट्टीसह खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. साई गणेश एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा. श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १०. | प्रभाग समिती जुना ई नवीन आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. जुना ८८ नवीन ११२ मधील | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. आकाश कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली |

| | | |
|---|---|---|
| | हेटकर आळी येथील साईनिष्ठा अपा. ते ग्रिन कोर्ट पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा. श्रीम. दिक्षा घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ११ | प्रभाग समिती जुना ई नवीन आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. जुना ७२ नवीन १०३ मधील माडीभाट ते सादोडी क्रॉस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे साई गणेश एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा. श्री. अतुल सांळुखे<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १२ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील सुरुची बागेच्या तटालगत संरक्षक भिंत बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. ओमकार कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा ४.९९% जास्त दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.अफीफ शेख सूचक :- मा. श्री. दिलीप गोवारी<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १३. | प्रभाग समिती जुना ई नवीन आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. जुना ८२ नवीन ११३ मधील म.ग. परुळेकर शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यास खडीकरण व डांबरीकरण करणे व आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. साई गणेश एंटरप्रायझेस (श्री.दिनेश घरत) ह्यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.अफीफ शेख सूचक :- मा. श्री. दिलीप गोवारी<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| १४. | प्रभाग समिती एच मधील वॉर्ड क्र. ९३ मध्ये अंबाडी रोड येथील जुने वाचनालय इमारतीचे पहिल्या व दुसल्या मजल्याचे दुरुस्ती करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. अरविंद एंटरप्रायजेस ह्यांची निविदा ११.१२% कमी दराने व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा. श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | प्रभाग समिती ब कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पु.) प्रभाग क्र.३२ मधील तुळींज मुख्य रस्ता ते गोविंद भगवती कॉम्पलेक्स पर्यंत रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणे (नागरी दलीत वस्ती योजना) | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा वि. क्र. १८ दि. २०/०२/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता आली देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.सुनिल हिरालाल राठोड यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १३.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ७३ (क) अन्वय या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा. श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील बाभोळ नाका ते वर्तक चौक डिव्हायडर वर ग्रील बसविणे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा वि. क्र. १८ दि. २०/०२/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता आली देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.सुनिल हिरालाल राठोड यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १३.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा. श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र. ११५ जूचंद्र येथिल तलावामध्ये रंगीत कारंजे बसविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामाच्या रक्कम रु. २०.०० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी तसेच B-२ पध्दतीने ई-निविदा मागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १८ | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र. ९१ मध्ये राजावली गावामध्ये स्मशानभूमी विकसीत करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामाच्या रक्कम रू. २०,२५,४७२/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. याकामी निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १९ | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र. १०५ मध्ये जुचंद्र येथे कैलास म्हात्रे इमारतीजवळ आर.सी.सी. बॉक्स कल्वर्ट बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामाकरीता बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यास तसेच सदर कामाच्या रक्कम रू. ६४,६८,०६०/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. याकामी निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा. श्री. अतुल साळुंखे<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २० | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र. ९० मध्ये वालिव फाटा येथे महेंद्र शेरुम जवळ बॉक्स कल्वर्ट बांधणे कामाचे अंदापजत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणे बाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर कामाकरीता बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यास तसेच सदर कामाच्या रक्कम रू. ३०,९३,८५६/-च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. याकामी निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा. श्री. अतुल साळुंखे<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २१ | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करणे. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दि. १५/११/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या पाहता मे. एच.टी.जाधव ॲण्ड असोशिएट्स, मे श्रध्दा लॅण्ड सर्वेअर व मे.राणे मॅनेजमेंन्ट कन्स प्रा.लि. यांची निविदा दर सन २०१९-२०, सन २०२०-२१ न सन २०२१-२२ करीता सर्वात कमी व वाजवी आहेत. तसेच सदर निम्नत्तम दराने निविदेमध्ये सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक मे. आर्कव्ह्यु इंजिनिअर्स प्रा.लि., मे एच.टी. जाधव ॲण्ड असोशिएट्स, मे. श्रध्दा लॅण्ड सर्वेअर व मे. राणे मॅनेजमेंट कन्स प्रा.लि. काम करणेस इच्छुक असल्यास त्यांनाही पॅनलवर नियुक्तत करणेकरीता दि. २२/०१/२०१९ रोजी पत्र देण्यांत आले होते. सदर पत्रास अनुसरून आर्कव्ह्यु इंजिनिअर्स प्रा.लि.,यांनी आपल्या दि. २१/०२/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे मे एच.टी.जाधव ॲण्ड असोशिएट्स यांनी आपल्या दि. २०/०२/२०१९ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मे.श्रध्दा लॅन्ड सर्व्हेअर यांनी आपल्या दि.२१/०२/२०१९ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मे.राणे मॅनेजमेंट कन्स.प्रा.लि.यांनी आपल्या दि.२०/०२/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे इतर सर्व निविदा धारकांच्या निम्नत्तम दराने काम |

| | | |
|---|---|---|
| | | करण्याची तयारी दर्शविली असुन त्यांनाही सदर पॅनेलवर समाविष्ट करुन घेण्यात येत असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करण्यास मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा. श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २२. | **सन २०१९-२०, सन २०२-२१ व सन २०२१-२२ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीची दैनंदिन सुरक्षा देखभाल व इतर सर्व कामे करणे.** | ठराव :- सदर कामी मा.सर्वसाधारण सभा विषय/ठराव क्र. १६ दि. १९/१२/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या पाहता सन २०१९/२० ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता म.मराठा इंटेलीजंस सिक्युरिटी सर्व्हिसेस, मे.गुरुजी इन्फ्रा प्रा.लि.व मे.शिवम एंटरप्रायझेस अॅन्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लि.यांचे निविदा दर समान व सर्वात कमी निविदादर प्राप्त झाले आहे. तसेच सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता मे.गुरुजी इन्फ्रा प्रा.लि. व मे.शिवम एंटरप्रायझेस अॅन्ड पर्सनल सर्व्हिसस प्रा.लि.यांचे निविदा दर व सर्वात कमी निविदा दर प्राप्त झाले आहेत. तसेच मे.गुरुजी इन्फ्रा. प्रा.लि., मे. शिवम एंटरप्रायझेस अॅन्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लि.व मे मराठा इंटेलीजंस सिक्युरिटी सर्व्हिसेस यांना दि.०१/०२/२०१९ वाटाघाटी संदर्भात पत्र देण्यात आले असुन त्यांच्या सोबत दि.०२/०२/२०१९ रोजी दुपारी १२:०० वाजता निम्नस्वाक्षरीकार यांच्या दालनात सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असुन सदर कामी सर्व निविदा धारकांनी भरलेले दर हे किमान वेतन कायद्यानुसार योग्य असल्याचे दिसुन येत आहे. व त्यांनीही आपल्या दि.११/०२/२०१९ रोजीच्या लेखी पत्राद्वारे सदरचे दर किमान वेतनप्रमाणे असल्याचे कळविले आहे. तसेच, सदरचे दर महाराष्ट्र शासन किमान वेतन नियमानुसार योग्य आहे. तरी सदर कामी सन २०१९-२० करीता मे.गुरुजी इन्फ्रा. प्रा.लि., मे. शिवम एंटरप्रायझेस अॅन्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा.लि.व मे मराठा इंटेलीजंस सिक्युरिटी सर्व्हिसेस यांचे निविदादर किमान वेतनानुसार योग्य आहेत तसेच सन २०२०-२१ व सन २०२१-२२ करीता मे.गुरुजी इन्फ्रा.व मे.शिवम एंटरप्रायझेस अॅन्ड पर्सनल सर्व्हिसेस यांचे निविदा दर किमान वेतनानुसार योग्य तसेच समान असल्याने सदरकामी तिन्ही निविदाधारकांच्या निविदादरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करण्यास देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा. श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २३. | वसई विरार शहर महानगरपालिका उसगाव/शिरवली २० द.ल.ली योजनेच्या पारोळ जलशुध्दीकरण केंद्रामधील शुध्द पाण्याच्या १२० HP क्षमतेचा पंप बदलून नवीन पंप बसविणे व कर्यान्वित करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व मे.ए.आर.एंटरप्रायझेस यांच्या रु.१५,६५,०००/- कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत असुन मे.ए.आर.एंटरप्रायझेस यांच्याशी कामाची संविदा करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा. श्रीम. सुषमा लोपिस<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २४. | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.११० मधील सागरशेत येथील रवी जाधव चौक ते निरंतर बंगलो पर्यंत रस्त्याची उंची वाढविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वरीलकामी तयार करण्यात आलेल्या रु.२३,३७,१०६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री.विद्या पाटील सूचक :- मा. श्री. अफीफ शेख<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २५. | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०३ मध्ये सालोली येथील अंबाडीवाडी ते सादोळा क्रॉस पर्यंत आर.सी.सी. पाईप क्रॉसिंग बांधणे व रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वरीलकामी तयार करण्यात आलेल्या रु.२८,७४,१०७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.विद्या पाटील सूचक :- मा. श्री. अफीफ शेख<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| २६. | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातली वॉर्ड क्र. १०३ मध्ये गिरीज मुख्य रस्ता ते जोगश्वरी पाडया पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वरीलकामी तयार करण्यात आलेल्या रु.२९,०६,१८०/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.विद्या पाटील सूचक :- मा. श्री. अफीफ शेख<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २७. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.७१ मधील अन्नाडीस कंपाऊंड येथील दिपक मेडीकल ते हवाईपाडा येथील स्टार किराणा स्टोअर्स पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजत्रकीय रक्कम रु १६०९८८८% इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाची विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या रु. १६०९८८८/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २८. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.७१ मधील जब्बार कंपाऊंड येथील भोला मास्टसर चाळ मध्ये हरी ओम डेअरी ते साई इलेक्ट्रॉनिक्स पर्यंत आर.सी.सी पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजत्रकीय रक्कम रु ४५८९६९३% इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाची विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या<br>अनुषंगाने येणाऱ्या रु. ४५८९६९३% खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| २९. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.७१ मधील अन्नाडीस कंपाऊंड येथील माँ जिवदारी मोबाईल शॉप ते हवाईपाडा येथील शंकर डेअरी पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजत्रकीय रक्कम रु २७१०६३१% इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामाची विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या रु. २७१०६३१% खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३०. | प्रभाग समिती - सी, विरार (पु) प्रभाग क्र.२३ मध्ये निराबाई संकूलच्या मागील बाजूस नाला बांधणे याकामी विचार विनिमय करणे. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५४,४९,३५१/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३१. | प्रभाग समिती- सी, वॉर्ड क्र.२ मध्ये कोपरी येथे कोपरी स्मशानभूमीशेजारी निवारा शेड बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. १८,९२,४२६/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३२. | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र. ३५ मध्ये उमराळे मराडी गावातील रस्त्याच्या कडेलगत बावखालला लागून संरक्षक भिंत बांधणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. (१३,३०,२२६/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपिस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ३३. | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र. ३४ मध्ये नवापुर चार रस्ता ते मोठामहालपाडा पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. (२३,४२,९७१/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपिस<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३४. | प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र. ३४ मध्ये नवापूर येथील मोठामहालपाडा ते किणीपडयापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- तरी सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. (२८,८७,३५४/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपिस<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३५. | प्रभाग समिती - सी विरार (पु) वॉर्ड क्र.१ मध्ये गासकोपरी तलावाचे सुशोभिकरण करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेत वाचन करणेंत आले. गासकोपरी तलावाचे सुशोभिकरण करणेच्या कामाची रक्कम रु. ७५ लाखाचे वर असल्याने प्रस्ताव महासभेच्या पटलावर ठेवणेंत यावा यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.नितीन राऊत सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३६. | प्रभाग समिती एच विभागातील चुळणे येथील कौल हेरीटेज येथे उंच साठवण टाकीजवळ कर्मचारी निवासस्थान बांधणे व कर्मचारी कर्मचारी निवासस्थानाचा परिसर सुशोभित करणे आणि संरक्षक भिंत बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुततम दरांची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. हमीद जे.शेख यांची १०.००% कमी दराची निविदा ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त ह्यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस तसेच इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३७. | वसई विरार शहरम महानगरपालिका क्षेत्रातील दि.२५/०३/२०१९ ते दि. १४/०४/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करणेंत आली. प्रस्तावात नमुद दि. २५/०३/२०१९ ते दि. १४/०४/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे इतिवृत्त हे मा.स्थायी समितीचे माहितीसाठी दिलेले आहे. सदरचे इतिवृत्त सभागृहाने अवलोकन केले व एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| | प्रतिवृत्त स्थायी समिती च्या माहितीसाठी | |
| ३८. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या काशिद कोपर MBR येथे कर्मचाऱ्यांसाठी दोन खोल्याचे कर्मचारी कक्ष बांधणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्ताव पुन्हा तपासुन मा.स्थायी समितीस मंजूरीकरीता सादर करणेस व तोपर्यंत सदर प्रस्तावास स्थगिती देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या १०० द.ल.ली पाणी पुरवठा योजना (सुर्या टप्पा-१) अंतर्गत मासवण येथील (जि.पालघर) उंदचन केंद्र येथे संरक्षक भिंत बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.अभय बी.जाधव यांच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे. अभय बी. जाधव यांच्याशी कामाची संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. अफीफ शेख सूचक :- मा. श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४०. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उसगाव/शिरवली २० द.ल.ली पाणी पुरवठा योजना अंतर्गत पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे विविध स्थापत्य विषयक दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.नितीन जी म्हात्रे यांच्या २.०० % कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे. नितीन म्हात्रे यांच्याशी कामाची संविदा करण्यास ही सभ मंजूरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा. श्री. कल्पेश मानकर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका